# जाहिरनामा

## उपविभागीय दंडाधिकारी खेड यांचे कार्यालय, जिल्हा रत्नागिरी
## पोलिस पाटील पदभरती साठी जाहिरात 2023
## जाहिरात क्र. 01/2023

रत्नागिरी जिल्हयातील खेड उपविभागातील उपविभागीय दंडाधिकारी, खेड कार्यालयांतर्गत गाव पोलिस पाटील पदभरतीसाठी अर्हता धारक उमेदवाराकडून विहित नमुन्यात फक्त ऑनलाईन पध्दतीनेच https://khedrtn.ppbharti.in या संकेतस्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहेत.

खेड उपविभागातील पोलिस पाटील संवर्गातील एकूण रिक्त पदे— 102

| ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरवात | ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत |
|---|---|
| दिनांक 07/09/2023 वेळ 00-00 वा. पासून | दिनांक 20/09/2023 सायं 5.30 पर्यंत |

पोलिस पाटील भरती प्रक्रिया संदर्भात सविस्तर जाहीरात https://khedrtn.ppbharti.in यासंकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी संपूर्ण माहीती काळजीपूर्वक समजून घेऊनच ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावेत. प्रस्तुत पदांकरीता केवळ उक्त संकेतस्थळावरुन विहित ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज विहित चलनाव्दारे भरलेले प्रक्रिया शुल्क ग्राहय धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. सदर संकेत स्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती बाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवारांची राहिल.

भरती प्रक्रिया/परीक्षा स्थगीत करणे किंवा रद्द करणे, अशंत: बदल करणे, पदांच्या एकूण वर्गवारी निहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट, आरक्षणात बदल करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रिये संदर्भात प्राप्त तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार उपविभागीय दंडाधिकारी, खेड यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल.

दिनांक : 04/09/2023
ठिकाण : खेड

उपविभागीय दंडाधिकारी, खेड
तथा,
अध्यक्ष पोलीस पाटील पदभरती
प्रक्रिया समिती — 2023

उपविभागीय दंडाधिकारी
खेड (रत्नागिरी)